शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८.
दिनांक - ७/१२/२००४

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

मास्टर माईन्ड इंग्लिश मेडि.
स्कूल, नवी सांगवी

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/अतिरिक्त तुकडया मंजूर करणे बाबत. [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक व्हीएनएस/१००२/[१०००/०२] /प्राशि-३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. ४/१२/०४ चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद इयत्ताच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया वर्गांना २००४ - २००५ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक का अतिरिक्त | विनाअनुदानित / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| | मास्टर माईन्ड इंग्लिश मेडि स्कूल. नवी सांगवी. | इंग्रजी | ५ वी ते ७ वी | नैसर्गिक | प्रत्येकी प्रथम वर्गास मंजूरी |

शाळेने वरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेणी व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे. [एस.एस.सी. डी.एड. ]

[कृ. मा. प.]

२] सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय यापूर्वी केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.